**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७७२/२०२५**
**निशाणी क्रमांकः– १२ खाली**
**संगिता बजाज वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,
माझे नावः– संगिता नंदकिशोर बजाज

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती. दर्शना सपकाळ यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. मी माझ्या पतीच्या मृत्यु प्रमाणपत्राचा मुळ दाखला दाखल केला आहे. त्यास **नि.१३** देण्यात येत आहे. माझे सासु व सासरे यांच्या मृत्यूच्या दाखल्याच्या झेरॉक्स प्रती मी दाखल केलेल्या आहेत व मुळ प्रती सोबत आणल्या आहेत. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिल्या त्या बरोबर आहेत. झेरॉक्सला **नि.१४ व १५** देण्यात येत आहे. माझ्या सास–यांच्या नावावर असलेल्या नोदणीकृत खरेदीखत क्र.४८०९/२००९ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१६** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक जनखुलासा या पेपरमध्ये दि.३१/०७/२०२५ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.02.27 13:34:35 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः– २७/०२/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**